ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)**

(Established by Government of Maharashtra in the year 1989)

# व्यवस्थापन मंडळ बैठक

## Board of Management Meeting

## कार्यवृत्त

**Minutes of the Meeting**

**बैठक क्रमांक** : 198
(Meeting Number)

**स्थळ(Venue)** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२
Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक** : सोमवार, दिनांक 27 जानेवारी 2025
**(Day and Date)** : Monday, 27 January 2025

**वेळ** (Time) : सकाळी 11.30 वाजता (11.30 a.m.)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

## 198 वी व्यवस्थापन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 198 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने सोमवार, दि. 27 जानेवारी 2025 रोजी दुपारी 11.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | अध्यक्ष |
| 02 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 03 | मा. डॉ. संजय भावे, मा. कुलगुरू कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 04 | मा. प्रा. वाल्मिक सरवदे, प्र-कुलगुरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजी नगर | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 05 | मा. श्री. नरेंद्र जोशी, अंबेजोगाई | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 06 | मा. प्रा. एन. के. दास, स्कूल ऑफ एज्युकेशन, इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिवर्सिटी, नवी दिल्ली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 07 | मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण यांचे प्रतिनिधी श्री. अनिल गावित नाशिक | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 08 | मा. डॉ. संजीवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 09 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 10 | मा. डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 11 | श्री. दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सचिव |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. सचिव, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 02 | मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 03 | मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 04 | मा. संचालक, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 05 | मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |

| अनु.क्रमांक<br>Subject No. | | तपशील<br>Details |
|---|---|---|
| 198.1 | | **स्वागत**<br>मा. व्यवस्थापन मंडळाचे सदस्य सचिव श्री. दिलीप भरड यांनी ऑफलाईन तसेच ऑनलाईन पद्धतीने उपस्थित सर्व सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. |
| | | मा. व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष तथा मा. कुलगुरू यांनी विद्यापीठाची विविध क्षेत्रातील प्रगती आणि चालू असलेल्या कार्याच्या माहितीचा सर्व सदस्यांना अवगत व्हावे म्हणून आढावा सादर केला.<br>1. दिनांक 03 जानेवारी 2025 रोजी भारताचे कृषीमंत्री मा. ना. शिवराज सिंग चौहान आणि महाराष्ट्राचे कृषी मंत्री मा. ना. माणिकराव कोकाटे यांनी विद्यापीठाला भेट दिली. त्यावेळी त्यांनी जमलेल्या शेतकऱ्यांशी चर्चा केली. उद्योजक शेतकऱ्यांनी विकसित केलेल्या उत्पादनांची माहिती जाणून घेतली. 'कॉमन वेल्थ ऑफ लर्निंग' आणि 'एम.के.सी.एल.' यांच्या संयुक्त विद्यमाने मुक्त विद्यापीठ 'शेतकऱ्यांसाठी कृत्रीम बुद्धिमत्ता साक्षरता' ('AI Literacy for Farmers') हा प्रमाणपत्र शिक्षणक्रम विनाशुल्क राबवित आहे. आजपर्यंत 10000 शेतकऱ्यांनी या उपक्रमात नोंदणी केलीय.<br>2. महाराष्ट्र शासनाच्या 'Digital University' या संकल्पनेसाठी महाराष्ट्र शासनाने उन्नत विद्यापीठ म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला संधी दिली आहे. यबाबतचे शासनाचे पत्र विद्यापीठाला प्राप्त झाले आहे. शासनाच्या निर्देशानुसार शासनाला प्रस्ताव पाठविण्याचे काम सुरू आहे.<br>3. पालघरमध्ये देशातील सगळ्यात मोठे 'वाढवन' बंदर होत आहे. बंदरात काम करण्यासाठी खूप मोठे मनुष्यबळ लागणार आहे. 'ऑन जॉब ट्रेनिंग' अंतर्गत 19 skilled आणि unskilled जॉबची यादी वाढवन बंदराकडून विद्यापीठाला प्राप्त झाली आहे. त्यांपैकी 17 शिक्षणक्रमांचे काम पूर्ण झाले आहे. फक्त दोन शिक्षणक्रमांपैकी 'खलाशी' आणि 'मासेमारी' यांचेबाबत पुढील प्रक्रिया सुरू आहे.<br>4. विद्यापीठाच्या जानेवारीमधील सर्व शिक्षणक्रमांच्या परीक्षा 9 जानेवारी ते 13 जानेवारी दरम्यान 225 परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे पार पडल्या आहेत. विद्यापीठातील सर्व शिक्षणक्रमांच्या साधारण 2,25,000 उत्तरपुस्तिकांच्या तपासणीचे काम महाराष्ट्रातील 30 कॅप सेंटरवर ऑनलाईन पद्धतीने सुरू झाले आहे. सर्व शिक्षणक्रमांचे निकाल विनाविलंब लावण्यासाठी निकालाचे काम सुरू करण्यात आले आहे.<br>विद्यापीठाचा 30 वा दिक्षांत समारंभ 24 फेब्रुवारी 2025 रोजी महाराष्ट्र राज्याचे महामहीम राज्यपाल तथा सगळ्या विद्यापीठांचे कुलपती यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला आहे. या समारंभामध्ये शैक्षणिक वर्ष 2023-24 या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या संबंधित 1,69,000 विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका, प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. सर्व सन्माननीय सदस्यांनी उपस्थित रहावे अशी ही विनंती केली. |

| | | |
|---|---|---|
| | | 5. शासनाच्या 'शाळा संपर्क अभियान-2' आणि 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या अभियानांचा भाग म्हणून मुक्त विद्यापीठाने 1 जानेवारी ते 18 फेब्रुवारी 2025 या कालावधीत महाराष्ट्रातील 36 जिल्ह्यांमध्ये हे अभियान पोहोचविण्यासाठी 2 मोठे चित्ररथ तयार केले आहेत. या चित्ररथांवरील मोठ मोठ्या पोस्टर्सद्वारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत शिक्षणक्रमांची माहिती दृकश्राव्य माध्यमांद्वारे दिली जाते. या चित्ररथांद्वारे कमी कालावधीत जास्त लोकांपर्यंत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची माहिती एकाचवेळी पोहोचवली जात आहे.<br>मा. कुलगुरू तथा अध्यक्ष, मा. प्र-कुलगरु, मा. परीक्षा नियंत्रक यांनी सादर केलेल्या आढाव्यावर सर्व सदस्यांनी समाधान व्यक्त करून सर्वांचे अभिनंदन केले आणि विद्यापीठाच्या भविष्यातील संकल्पपूर्तीसाठी शुभेच्छा दिल्या. मा. कुलगुरू तथा अध्यक्ष यांच्या परवानगीने विषयपत्रिकेतील विषयांवर चर्चेस प्रारंभ करण्यात आला. |
| 198.2 | 198.2.1 | **दिनांक 31 डिसेंबर 2024 रोजी झालेल्या 197व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दिनांक 31 डिसेंबर 2024 रोजी झालेल्या 197व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त सचिव श्री. भरड यांनी वाचून दाखविले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 198.2.2 | **दिनांक 31 डिसेंबर 2024 रोजी झालेल्या 197 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दिनांक 31 डिसेंबर 2024 रोजी झालेल्या 197व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल सचिव श्री. भरड यांनी वाचून दाखविले. मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी कार्यवाहीची नोंद घेतली. |
| 198.3 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 198.3.1<br>आस्थापना<br>कक्ष | **वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार व इमरटस प्राध्यापक पदावर कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना सुधारित मानधन रु. 75,000/- अदा करणेबाबत....**<br>**टिपणी :**<br>1. दिनांक 02.09.2024 रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन मंडळ सभेच्या ठराव क्र. 195.3.10 अन्वये सेवानिवृत्तांच्या नियुक्त्या, अतिरिक्त पदभार स्विकारणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचाऱ्यांना द्यावयाचे मानधन हे जुलै 2023 पासून देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.<br>2. व्यवस्थापन मंडळ सभेच्या ठराव क्र. 195.3.10 अन्वये सर्व वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार व इमरटस प्राध्यापक पदावर नियुक्त झालेल्या शिक्षकांचे मानधन रु. 75,000/- प्रतिमाह अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.<br>3. या ठरावानुसार डॉ. व्ही. बी. गायकवाड, पुणे यांना 5.9.2024 पासून व डॉ. नारायण मेहेरे, नागपूर यांना 18.9.2024 पासून प्रतिमाह रु. 75,000/- अदा केले जात आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार व इमरटस प्राध्यापक यांना उपरोक्त मुद्दा क्र. 2 अन्वये व्यवस्थापन मंडळाच्या ठरावात सुधारित मानधन कधीपासून द्यावयाचे आहे यासाठी सदर विषय व्यवस्थापन मंडळासमोर पुर्नविचारार्थ व मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : मा. व्यवस्थापन मंडळ ठराव क्रमांक 195.3.10 यात सुधारणा करून मुद्दा क्रमांक 02 अन्वये वरीष्ठ शैक्षणिक सल्लागार व इमरटस प्राध्यापक यांना सुधारित मानधन 1 एप्रिल 2024 पासून देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 198.3.2<br>परीक्षा विभाग | **विद्यापीठ मानदंडाचे वजन, उंची व इतर बाबींच्या बदलांबाबत...**<br><br>**टिपणी :**<br>1. विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभामध्ये मिरवणुकीवेळी असणाऱ्या मानदंडाचे वजन, उंची व इतर बाबींच्या बदलास व त्यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास परीक्षा मंडळाने सर्वानुमते मान्यता दिली आहे.<br>2. तसेच मानदंडाऐवजी 'ज्ञानदंड' असा उल्लेख करण्यात यावा<br>3. यापूर्वीचा 'ज्ञानदंड' परीक्षा नियंत्रक कार्यालयात जतन करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.<br><br>परीक्षा मंडळ ठराव क्र. 53.3.4 नुसार वरील तीनही शिफारशी मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : परीक्षा मंडळ ठराव क्र. 53.3.4 नुसार वरील तीनही शिफारशींना सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 198.3.3<br>वित्त समिती | **वित्त समिती सदस्यांचे नामनिर्देशन करून मिळणेबाबत....**<br><br>**टिपणी :** विद्यापीठ परिनियम क्र. 1* (1 of 1991) (see section 19 of the Act) क्र. 3(iii) व (iv) नुसार व्यवस्थापन मंडळाद्वारे व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेल्या 2 सदस्यांपैकी सौ. सरोज अहिरे माननीय आमदार यांची डिसेंबर 2024 मध्ये व श्री. अनिल कुलकर्णी यांची 20 सप्टेंबर 2024 रोजी सदस्य म्हणून नियुक्तीचा कालावधी संपलेला आहे. तरी व्यवस्थापन मंडळाने नियुक्त केलेले व्यवस्थापन मंडळाच्या दोन सदस्यांचे नामनिर्देशन करून मिळणेसाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर ...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : वित्त समितीसाठी व्यवस्थापन मंडळातील पुढील 2 सदस्यांचे नामनिर्देशन मा. कुलगुरूंनी सुचित केले. (1) मा. डॉ. संजीवनी महाले, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, मा. सदस्य, व्यवस्थापन मंडळ आणि (2) मा. श्री. नरेंद्र जोशी, अंबेजोगाई, मा. सदस्य, व्यवस्थापन मंडळ. मा. कुलगुरूंनी सुचित केलेल्या नामनिर्देशनाला सर्व सदस्यांनी मान्यता दिली. |
| | 198.3.4<br>सभा व दप्तर कक्ष | **विद्वत परिषदेवर तीन संचालकांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव ...**<br><br>**टिपणी :** विद्वत परिषदेवर परिनियम क्रमांक 5(3)/1992 See Statute 8(a) of the Act मधील 3(vi) अन्वये असलेली तरतूद: "मा. कुलगुरूंनी शिफारस केलेले मा. व्यवस्थापन मंडळाने नामनिर्देशीत केलेले विद्याशाखांचे संचालक नसलेले व केंद्र/विभाग यांचे संचालक असणारे 3 |

| | | |
|---|---|---|
| | | पेक्षा जास्त नसलेले संचालक" यांचे विद्वत परिषदेसाठी 3 वर्षासाठी सदस्य नामनिर्देशित केले जातात. त्यानुसार 197 व्या बैठकीत प्रा. जयदीप निकम, प्रा. संजीवनी महाले आणि प्रा. सुरेंद्र पाटोळे यांच्या नावाची शिफारस करण्यात आली होती. मात्र परिनियम क्रमांक 5(3)/1992 See Statute 8(a) of the Act मधील 3(vi) अन्वये केंद्र/विभाग यांचे असलेले संचालक यांचे नामनिर्देशन असल्याने मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने<br>1. संचालक, कृषी विज्ञान केंद्र<br>2. संचालक, विद्यार्थी कल्याण व बहिशा:ल केंद्र<br>3. संचालक, नियोजन व सुसुत्रीकरण विभाग यांचे मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशन केले आहे. तसेच संचालक, मूल्यमापन केंद्र आणि संचालक, विदयार्थी सेवा विभाग या दोन्ही विभागाच्या संचालकांना जानेवारी 2024 पासून निमंत्रित सदस्य म्हणून बैठकीस उपस्थित राहण्यास मान्यता देण्यात आली आहे.<br>मा. व्यवस्थापन मंडळ यांच्या माहितीस्तव सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** मा. व्यवस्थापन मंडळ सभा ठराव क्रमांक 197.4.2 नुसार मा. विद्वत परिषदेसाठी तीन सदस्यांच्या नामनिर्देशनाचा ठराव करण्यात आला होता. परंतु परिनियम क्रमांक 5(3)/1992 See Statute 8(a) of the Act मधील 3(vi) अन्वये केंद्र/विभाग यांचे असलेले संचालक यांचे नामनिर्देशन असल्याने ठराव क्रमांक 197.4.2 नुसार केलेल्या नामनिर्देशनात बदल करून नव्याने (1) संचालक, कृषी विज्ञान केंद्र, (2) संचालक, विद्यार्थी कल्याण व बहिशा:ल केंद्र (3) संचालक, नियोजन व सुसुत्रीकरण विभाग यांचे नामनिर्देशन केले. सदर सुधारित नामनिर्देशनास सर्वानुमते मान्यता दिली. |
| | 198.3.5<br>वित्त विभाग | **दि. 22 जानेवारी 2025 रोजी आयोजित वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी :** दि. 22 जानेवारी 2025 रोजी वित्त समितीचे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दि. 22 जानेवारी, 2025 च्या वित्त समिती बैठकीच्या इतिवृत्ताचे सविस्तर अवलोकन करून मान्यता प्रदान करण्यात आली. इतिवृत्तातील खालील विषयाच्या अनुषंगाने मा. सदस्यांनी खालीलप्रमाणे विविध विषयांवर आपल्या सूचना तथा विचार विनिमय केला.<br>01 **वित्त समितीतील विषय क्र.** 03 : दि. 20 जानेवारी, 2025 रोजी खरेदी समितीच्या इतिवृत्तावर सविस्तर चर्चा होऊन खरेदी समिती बैठकीत झालेल्या ठरावांना सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.<br>त्याचप्रमाणे खरेदी समिती बैठकीतील ऐनवेळचा ठराव क्र. पीसी-10/2024-25/15 नुसार विद्यापीठाच्या वित्त विभाग, विद्यार्थी सेवा विभाग, स्कुल ऑफ ऑनलाईन एज्युकेशन, बोपोडी, पुणे येथील स्पर्धा परीक्षा केंद्र, नांदेड विभागीय केंद्र व डी कॅप सेंटर, मा. कुलगुरु कार्यालय, मा. प्र-कुलगुरु कार्यालय, कृषी विज्ञान विद्याशाखा, मानव्यविद्या व सा. शास्त्रे विद्याशाखा, नागपूर विभागीय केंद्र नवीन इमारत, पुणे |

विभागीय केंद्र नवीन इमारत, मुंबई विभागीय केंद्र नवीन इमारत, रत्नागिरी उपकेंद्राच्या नवीन इमारत इत्यादी ठिकाणी फर्निचर करण्यासाठी वास्तुविशारदाने निश्चित केलेल्या मोजमाप, डिझाईन, एकूण संख्या इत्यादीप्रमाणे बांधकाम कक्षामार्फत ई-निविदा प्रसिध्द करून खरेदी करणेबाबत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. यासाठी आवश्यक तेवढी आर्थिक तरतुद करण्यात यावी असेही ठरले.

02 **वित्त समितीतील विषय क्र. 05** : विद्यापीठाचा आर्थिक वर्ष 2024-25 चा सुधारित व 2025-26 चा प्रस्तावित अर्थसंकल्प विद्यापीठाचे वित्त अधिकारी, डॉ. गोविंद कतलाकुटे यांनी सादर केला. सदर अर्थसंकल्पाचे काही खालील वैशिष्ट्ये नमुद करण्यात आली.

01 नविन भौतिक सुविधेच्या योजना, विद्यार्थ्यांसाठीच्या योजना, कर्मचाऱ्यांकरिता कल्याणकारी योजना, शिक्षकांसाठी योजना प्रस्तावित केल्या. त्या सर्व योजनांवर सविस्तर चर्चा होऊन त्यास मान्यता प्रदान करण्यात आली. सदर तूटीचा अर्थसंकल्प हा विकासाभिमुख असल्याबाबत मा. कुलगुरु महोदयांनी याबाबत सविस्तर माहिती सभागृहाला दिली व नवीन योजना विद्यापीठाच्या भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रस्तावित केल्या असून त्याची भविष्यातील उपयोगिता नमूद केली. महाराष्ट्रातील विविध ठिकाणी विद्यापीठाच्या उपपरिसर निर्मितीचे काम अत्यंत जोमाने चालु असून काही उपपरिसरातील इमारती चालू वर्षात पुर्णही होतील असे नमुद केले. मा. कुलगुरु महोदयांनी वाढवण, जि. पालघर येथे होत असलेल्या बंदरासाठी आवश्यक व प्रत्येक स्तरावरील प्रशिक्षित मनुष्यबळ पुरवठा करण्याकरिता सामंजस्य करार होणार आहे. त्याकरिता विद्यापीठास वाढवण येथे शासनाकडून जमीन मिळविण्यासाठीचा प्रस्ताव सादर झाला आहे. तेथील भौतिक सुविधांसाठी खर्चाचे शीर्ष तयार करणे व त्यात किमान रु. 5 कोटीची तरतूद करण्याबाबत सुचविले.

02 मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापीठाचा सामाजिक उपक्रमासाठी नेहमीच सहभाग असतो त्याचा एक भाग म्हणून गोदावरी नदी स्वच्छता योजना विद्यापीठाने स्वतंत्रपणे राबविणेकरिता YCMOU Godavari Swachhata Project या शीर्षात किमान रु. 1 कोटीची तरतूद करण्याकरिता सुचना दिली.

03 मा. प्र-कुलगुरु यांनी अर्थसंकल्पात सुचविलेल्या विविध दुरुस्त्या करण्याचे सुचविले.

04 इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या सुचनांबाबतही सविस्तर चर्चा होऊन त्याप्रमाणे नोंदी घेण्याचे ठरले.

सदर अर्थसंकल्प सर्वसमावेशक असल्याचे सर्व सन्माननीय सदस्यांनी मत व्यक्त केले व अर्थसंकल्प वरील दुरुस्त्यांसह सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

03 **वित्त समितीतील विषय क्र.** 10 : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक विद्यापीठास डिजिटल विद्यापीठात उन्नत करणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत अंतिम मान्यतेकरिता ठेवण्यात आला.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या विभागनिहाय करण्यात येत असलेल्या 100 दिवसांच्या नियोजन आराखड्याबाबत मा. कुलगुरु महोदयांनी सर्वांना माहिती दिली. त्यानुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला डिजिटल विद्यापीठ म्हणून उन्नत करण्याबाबतच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार सदरची कार्यवाही करण्यास व त्याप्रमाणे शासनास प्रस्ताव सादर करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. त्याचप्रमाणे आर्थिक वर्ष 2025-26 च्या अर्थसंकल्पात आवश्यक तेवढी तरतुद करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

04 **वित्त समितीतील विषय क्र.** 11 : विद्यापीठाच्या मानधन, प्रवास व दैनिक भत्ता इत्यादी दर सुधारीत करण्यासाठी गठीत केलेल्या समितीच्या ठरावांमध्ये काही सुधारणासंह मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत अग्रेषित करण्यात आला होता. त्यानुसार सदर अहवालावर मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येऊन व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत काही सुधारणांसह अहवालास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

05 **वित्त समिती बैठकीतील ऐनवेळचा विषय क्र.** 01 : ग्रंथनिर्मिती केंद्र, ग्रंथ भांडार व वितरण या कक्षाचे प्रशासकीय कामाच्या अनुषंगाने कार्यभार निश्चित करणेबाबतचा विषयास वित्त समितीच्या बैठकीत मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत ठेवण्याबाबत शिफारस करण्यात आली. त्यानुसार मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत ग्रंथनिर्मिती केंद्र, ग्रंथ भांडार व वितरण या कक्षाचे प्रशासकीय कामाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा तथा विचारविनिमय करण्यात आला. सर्वानुमते इतर विद्यापीठांप्रमाणे सदर कक्ष वित्त विभागाच्या अखत्यारित आहेत. तसेच लेखासंहितेतही या विभागाचा कारभार वित्त विभागामार्फत चालतो. त्यानुसार सदर विभाग वित्त विभागाच्या अखत्यारित असण्याबाबत एकमत होऊन ठराव संमत करण्यात आला. प्रशासनाने याबाबत परिपत्रक काढावे असे सर्वानुमते ठरले.

06 **वित्त समिती बैठकीतील ऐनवेळचा विषय क्र.** 02 : 30 वा दीक्षांत संमारंभ आयोजनास आणि अंदाजे खर्च रु. 1,37,50,000/- खर्चास वित्त समितीच्या बैठकीत प्रत्यक्ष खर्च हा नियमानुसार ई-निविदा / दरपत्रके / वार्षिक दरकरार इत्यादी खरेदीची / सेवा पुरवठा देण्याबाबतची प्रक्रिया पुर्ण करून अंदाजे रक्कम रु. 1,37,50,000/- (रुपये एक कोटी सदतीस लक्ष पन्नास हजार फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. त्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत वित्त समिती बैठकीतील ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

07 **वित्त समिती बैठकीतील ऐनवेळचा विषय क्र.** 04 : विद्यापीठाच्या मुख्यालयात विविध विद्याशाखा संचालकांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांच्या विद्याशाखेत एकूण 12

| | | |
|---|---|---|
| | | विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभ आयोजनासंदर्भात अध्यादेश 10 (11) मधील तरतुदीनुसार समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार नियमन (Regulation) तयार करण्यात आलेले असून सदर नियमनाचा (Draft of Regulation) मसुदा सुचविलेल्या दुरुस्तीसह मा. व्यवस्थापन मंडळाच्या विद्यापीठ कायदा XX of 1989 मधील कलम 24 मधील तरतुदीनुसार मान्यतेसाठी सादर ...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभ आयोजनासंदर्भात नियमन (Regulation) तयार करणेसाठी गठित केलेल्या समितीचा अहवाल मा. व्यवस्थापन मंडळ सभेत सादर करण्यात आला.<br>1. विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभ आयोजनासंदर्भात नियमन (Reulation) तयार करणेसाठी गठित केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता दिली.<br>2. तसेच विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभ आयोजनासंदर्भात अध्यादेश 10 (11) मधील तरतुदीनुसार समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार तयार करण्यात आलेल्या नियमनाचा (Draft of Regulation) समुदा सुचविलेल्या दुरुस्त्यांसह मा. व्यवस्थापन मंडळाने विद्यापीठ कायदा XX of 1989 मधील कलम 24 मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात आली.<br>3. यापुढील दीक्षांत समारंभाचे आयोजन नियमनानुसार करण्यात यावे असे ठरले. |
| 198.4 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय** |
| | 198.4.1<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **विशेष बी.एड. शिक्षणक्रमासाठी श्रवणबाधिता (HI), दृष्टीबाधिता (VI), आणि बौद्धिक अक्षमता (ID) या प्रवर्गासाठी तीन नियमित शिक्षक (faculty) घेणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने भारतीय पुनर्वास परिषद, नवी दिल्ली (RCI) यांच्या सोबत 2017 मध्ये केलेल्या करारानुसार विद्यापीठात दिव्यांग अध्ययन केंद्र (Center for Disability Studies) स्थापन करण्यात आलेले आहे. सदर केंद्राला तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळ बैठक 173/7-08-2020 रोजी मान्यता देण्यात आली. RCI यांच्या नियमानुसार आलेल्या उच्च तज्ज्ञ सल्लागार समिती सदस्यांच्या बैठकीत सदर तीन दिव्यांग केंद्रासाठी 3 नियमित शिक्षक घेण्याविषयी ठराव क्रमांक 1 / 2 नुसार शिफारस केली आहे. समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळ यांच्या माहितीस्तव सादर<br>तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळ ठराव क्रमांक 187.3.17 नुसार या केंद्रासाठी करारावर नियुक्त्या करण्यास मान्यता दिलेली होती. सदर ठरावाची प्रत सोबत जोडली आहे. परंतु RCI च्या समितीने केलेल्या शिफारसीनुसार 3 नियमित शिक्षक घेण्याविषयीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** मा. कुलगुरू यांनी या विषयाबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना . 'मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेनंतर पदमान्यतेचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवला जाणार आहे. शासनाच्या मान्यतेनुसार पदभरतीची प्रक्रिया करण्यात येईल' अशी माहिती दिली. यानुसार नियमित शिक्षक भरतीला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | | Vertual Class Room / Studio व विद्यापीठाच्या आठ विभागीय केंद्रावर 08 Vertual Class Room / Studio करणेबाबत दि. 27 डिसेंबर, 2024 व दि. 20 जानेवारी, 2025 झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीत सर्व संचालकांनी मागणी केली व त्यानुसार मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे सदर ऐनवेळचा विषय वित्त समितीच्या बैठकीत ठेवण्यात आला. सदर व्यवस्था प्रस्थापित झाल्यास Online Learning च्या दृष्टीने व आवश्यक सर्व शैक्षणिक व प्रशासकीय कार्यवाही सुरळीतपणे करता येईल. त्यानुसार विद्यापीठ मुख्यालयात 12 व विद्यापीठाच्या आठ विभागीय केंद्रावर 08 Vertual Class Room / Studio तयार करण्यास व त्यासाठी रु. 10 कोटीची आर्थिक वर्ष 2024-25 व 2025-26 च्या अर्थसंकल्पात तरतुद करणेबाबतच्या विषयावर सविस्तर चर्चा करून विद्याशाखेत एकूण 12 Vertual Class Room / Studio व विद्यापीठाच्या आठ विभागीय केंद्रावर 08 Vertual Class Room / Studio करण्यास व त्यासाठी रु, 10 कोटीची तरतुद करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 198.3.6<br>सभा व दप्तर कक्ष | **दि. 13 जानेवारी 2025 रोजी आयोजित 65 व्या विद्वत परिषदेचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी :** दि. 13 जानेवारी 2025 रोजी 65 वी विद्वत परिषद आयोजित करण्यात आलेली होती. सदर विद्वत परिषदेचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेसाठी सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दि. 13 जानेवारी 2025 रोजीच्या 65व्या विद्वत परिषदेचे इतिवृत्त सभेचे सचिव श्री. भरड यांनी वाचून दाखवले. यातील क्रमांक 65.4.2 या ठरावात सुधारणा सुचविण्यात आली. 'बंदिजन, अंध, तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर), अनाथ आणि आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे पाल्य यांचेसाठी रु. 10/- इतकेच नोंदणी शुल्क आकारण्यात यावे' अशा सुधारित ठरावाला मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता दिली. |
| | 198.3.7<br>परीक्षा कक्ष | **विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभ आयोजनासंदर्भात नियमन (Regulation) तयार करणेबाबत...**<br>**टिपणी :** परीक्षा मंडळ बैठक क्र. 53, ठराव क्र. 53.3.03 अन्वये दीक्षांत समारंभाचा पोषाख, दीक्षांत विद्वत दिंडी/मिरवणूकीमध्ये कोणत्या अधिकार मंडळाचे सदस्य असावेत, व्यासपीठावर कोणत्या अधिकार मंडळाचे सदस्य उपस्थित असतील याबाबत कोणतीही नियमावली सद्यस्थितीत नसल्याने अध्यादेश 10 (11) मधील तरतुदीनुसार नियमन (Regulation) तयार करण्यात यावे असा ठराव पारीत करण्यात आलेला होता. या ठरावाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी मा. कुलगुरू महोदयांनी मा. प्र-कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती व या समितीने नियमन करण्यासाठी शिफारशी व नियमन तयार करावेत असे निर्देश दिलेले होते.<br>मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने समितीने दि. 11 जानेवारी 2025 रोजी बैठका आयोजित करून शिफारशींचा अहवाल तयार करण्यात आला. या शिफारशीच्या अनुषंगाने नियमनाचा मसुदा मा. कुलगुरू महोदयांना सादर केलेला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | 198.4.2<br>ज्ञानस्रोत केंद्र | **विद्यापीठातील सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना रु. 3000.00 परतावा या अनामत ऐवजी विनाअनामत आणि नि:शुल्क ग्रंथालय सभासदत्व देणेविषयीचा प्रस्ताव...**<br><br>**टिपणी :** ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत विद्यापीठातील सेवानिवृत्त शिक्षक आणि शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना रु. 3000.00 परतावा या अनामत ऐवजी विनाअनामत आणि नि:शुल्क ग्रंथालय सभासदत्व देणेविषयीच्या प्रस्तावाला मा. ग्रंथालय समितीने मान्यता दिलेली आहे. सदर समितीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. मात्र यात अनामत परतावा ऐवजी विनाअनामत आणि नि:शुल्क ग्रंथालय सभासदत्व देणेविषयीच्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** ज्ञानस्रोत केंद्राचे सभासद असलेले विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी यांचे वेतन विद्यापीठाद्वारे केले जाते. त्यामुळे जर एखाद्या कर्मचाऱ्याकडून पुस्तक हरवल्यास, खराब झाल्यास त्या पुस्तकाची किंमत संबंधित कर्मचाऱ्याच्या वेतनातून वसूल करता येऊ शकते. परंतु सेवानिवृत्त कर्मचाऱ्याकडून पुस्तक हरवल्यास, खराब झाल्यास पुस्तकाची किंमत वसूल करण्यासाठी विद्यापीठाकडे कोणतीही तरतुद नाही. त्यामुळे किमान रुपये 1000.00 अनामत रक्कम घेऊन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सभासदत्व देण्यात यावे याप्रमाणे मान्यता देण्यात आली. |
| | 198.4.3<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठातील शिक्षकांना कॅस अंतर्गत द्यावयाच्या लाभाबाबत...**<br><br>**टिपणी :** विद्यापीठातील नियमित शिक्षकांना सातव्या वेतन आयोगानुसार करिअर ॲडव्हान्समेंट योजनेअंतर्गत लाभ देण्याकरिता संबंधित Apex Body च्या निकषांनुसार CAS समितीचे आयोजन करावे लागणार आहे. विद्वत परिषदेच्या मान्यतेने समितीने किमान 6 विषयतज्ज्ञांचे पॅनल सादर करून त्यातील 3 विषयतज्ज्ञांचे नामनिर्देशन मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** करिअर ॲडव्हान्समेंट योजनेअंतर्गत विद्यापीठातील (1) डॉ. सुरेंद्र पाटोळे, सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा (2) डॉ. दयाराम पवार, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा (3) डॉ. सुभाष सोनुने, सहायक प्राध्यापक आणि (4) डॉ. प्रकाश बर्वे, उपग्रंथपाल या शिक्षकांच्या पदोन्नतीसाठी विद्याशाखानिहाय प्रत्येकी 3 तज्ज्ञ व्यक्तींची पॅनलमध्ये समिती सदस्य म्हणून मा. विद्वत परिषदेच्या वतीने मा. कुलगुरूंनी नामनिर्देशन केले आहे.<br>(1) वाणिज्य व व्यवस्थापन – प्रा. वाणी लातुरकर, प्रा. दत्ता गुजराथी आणि प्रिती कुलकर्णी<br>(2) शिक्षणशास्त्र – प्रा. आर. सी. पटेल, प्रा. राजेंद्र पटेल आणि प्रा. बाविस्कर<br>(3) ज्ञानस्रोत केंद्र – प्रा. राजेंद्र कुंभार, प्रा. जगदीश कुलकर्णी आणि प्रा. मालन खिराडे<br>(4) तसेच निवड समितीतील क्रमांक 6 मध्ये नमूद केल्यानुसार – अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा विमुक्त जमाती किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्गातील प्राध्यापक किंवा प्राचार्य पदाच्या खाली नसलेली एक व्यक्ती – प्रा. राम ठाकर<br>मा. कुलगुरूंनी विद्वत परिषदेच्या वतीने केलेल्या वरील 4 नामनिर्देशनांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | | विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभ आयोजनासंदर्भात अध्यादेश 10 (11) मधील तरतुदीनुसार समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार नियमन (Regulation) तयार करण्यात आलेले असून सदर नियमनाचा (Draft of Regulation) मसुदा सुचविलेल्या दुरुस्तीसह मा. व्यवस्थापन मंडळाच्या विद्यापीठ कायदा XX of 1989 मधील कलम 24 मधील तरतुदीनुसार मान्यतेसाठी सादर ...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभ आयोजनासंदर्भात नियमन (Regulation) तयार करणेसाठी गठित केलेल्या समितीचा अहवाल मा. व्यवस्थापन मंडळ सभेत सादर करण्यात आला.<br>1. विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभ आयोजनासंदर्भात नियमन (Reulation) तयार करणेसाठी गठित केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता दिली.<br>2. तसेच विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभ आयोजनासंदर्भात अध्यादेश 10 (11) मधील तरतुदीनुसार समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार तयार करण्यात आलेल्या नियमनाचा (Draft of Regulation) मसुदा सुचविलेल्या दुरुस्त्यांसह मा. व्यवस्थापन मंडळाने विद्यापीठ कायदा XX of 1989 मधील कलम 24 मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात आली.<br>3. यापुढील दीक्षांत समारंभाचे आयोजन नियमनानुसार करण्यात यावे असे ठरले. |
| 198.4 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय** |
| | 198.4.1<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **विशेष बी.एड. शिक्षणक्रमासाठी श्रवणबाधिता (HI), दृष्टीबाधिता (VI), आणि बौद्धिक अक्षमता (ID) या प्रवर्गासाठी तीन नियमित शिक्षक (faculty) घेणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने भारतीय पुनर्वास परिषद, नवी दिल्ली (RCI) यांच्या सोबत 2017 मध्ये केलेल्या करारानुसार विद्यापीठात दिव्यांग अध्ययन केंद्र (Center for Disability Studies) स्थापन करण्यात आलेले आहे. सदर केंद्राला तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळ बैठक 173/7-08-2020 रोजी मान्यता देण्यात आली. RCI यांच्या नियमानुसार आलेल्या उच्च तज्ज्ञ सल्लागार समिती सदस्यांच्या बैठकीत सदर तीन दिव्यांग केंद्रासाठी 3 नियमित शिक्षक घेण्याविषयी ठराव क्रमांक 1 / 2 नुसार शिफारस केली आहे. समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळ यांच्या माहितीस्तव सादर<br>तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळ ठराव क्रमांक 187.3.17 नुसार या केंद्रासाठी करारावर नियुक्त्या करण्यास मान्यता दिलेली होती. सदर ठरावाची प्रत सोबत जोडली आहे. परंतु RCI च्या समितीने केलेल्या शिफारसीनुसार 3 नियमित शिक्षक घेण्याविषयीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** मा. कुलगुरू यांनी या विषयाबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना . 'मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेनंतर पदमान्यतेचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवला जाणार आहे. शासनाच्या मान्यतेनुसार पदभरतीची प्रक्रिया करण्यात येईल' अशी माहिती दिली. यानुसार नियमित शिक्षक भरतीला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठाच्या शासनाकडे सादर केलेल्या आकृतीबंधानुसार शासनाच्या मान्यतेनंतर करावयाच्या पदभरतीला तसेच विद्यापीठाच्या प्रगतीचा विचार करून प्रस्तावित नवीन पदांना मा. व्यवस्थापन मंडळाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. नवीन पदांसाठीची शैक्षणिक पात्रता, कार्यकाळ, अटी व शर्ती, वेतन, कर्तव्ये व त्यांच्या कार्यप्रणालीबाबत नियमावली तयार करून व्यवस्थापन मंडळापुढे सादर करण्याची सुचना केली. सुचनेसहित प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 198.4.6<br>स्कूल ऑफ ऑनलाईन अँड डिजिटल एज्युकेशन | **विद्यापीठातील नवीन सुरू झालेल्या 'School of Online Education' चे नाव 'School of Digital Education' करण्याच्या प्रस्तास मान्यता मिळणेबाबत ...**<br>**टिपणी :** मा. व्यवस्थापन मंडळ सभा क्र. 188 दि. 20 जून, 2023 मध्ये झालेल्या ठराव क्र. 188.3.16 अन्वये School of Online Learning या विद्याशाखेची स्थापना करण्यात आली. परंतु विद्याशाखेच्या नामाभिधानामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार शिक्षण पद्धतीत झालेले आणि येऊ घातलेले आमुलाग्र बदल लक्षात घेता, मुक्त, दुरस्थ व Online Learning या नामाभिधानामुळे येणाऱ्या मर्यादा दूर करण्यासाठी 'School of Online Education' असे नामाभिधान मा. व्यवस्थापन मंडळ ठराव क्रमांक 197.4.1 दि. 31-डिसेंबर-2024 नुसार करण्यात आले.<br>विद्यापीठाला 'Digital University' म्हणून उन्नत करण्याची संकल्पना महाराष्ट्र शासनाने मांडली. त्याच्या धर्तीवर व्यापक स्वरूपात शिक्षणक्रम पोहोचविण्यासाठी 'School of Online Education' या विद्याशाखेचे नामाभिधान दुरुस्त करून 'School of Digital Education' असे करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** बदलत्या काळातील व्यापकता लक्षात घेता 'School of Online Education' या विद्याशाखेचे नामाभिधान दुरुस्त करून 'School of Digital Education' असे करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 198.4.7<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **दिव्यांगांसाठी दिव्यांग केंद्र स्थापन करणेबाबत ...**<br>**टिपणी :** पुणे येथील दिव्यांगासाठी काम करणाऱ्या 'सावली' या संस्थेने दिव्यांगासाठी दिव्यांग केंद्र स्थापन करण्यासाठी 10 कोटी रुपये देण्याबाबतचे पत्र विद्यापीठाला प्राप्त झाले आहे. विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत स्पेशल बी.एड. अंतर्गत दिव्यांगासाठीचा शिक्षणक्रम सुरू आहेच. त्यासाठी 500 जागांना मान्यता आहेच. दिव्यांग केंद्राला विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** पुणे येथील संस्थेकडून प्राप्त होणाऱ्या निधीद्वारे दिव्यांग केंद्र स्थापन करण्यास मा. व्यवस्थान मंडळाच्या सदस्यांनी तत्वत: मान्यता दिली. 'सावली' या संस्थेला अभिप्रेत असलेल्या कार्यासाठी त्यांच्यासोबत सामंजस्य करार करून त्याची नियमावली तयार करण्यात यावी असे सुचित केले. मा. व्यवस्थापन मंडळाच्या सुचनेसह सदर प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |

198.4.8

कृषी विज्ञान विद्याशाखा

**कृषी विज्ञान विद्याशाखेंतर्गत पदविका आणि प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसन कार्यासाठी प्रात्यक्षिक कार्यपुस्तिकेच्या लेखन आणि संपादन मानधन दरास मा. व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळणेबाबत...**

**टिपणी :** वित्त समिती ठराव क्रमांक 14 दि. 15 जुलै, 2024 व मा. व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 194.9.3 दि. 18 जुलै, 2024 मध्ये मान्य करण्यात आलेल्या शिक्षणक्रम विकसन कामासाठीच्या मानधन दरांमध्ये प्रात्यक्षिक कार्यपुस्तिकेच्या दरांचा उल्लेख नाही. पदविका आणि प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या पाठपुस्तिकेसाठी एका घटकांसाठी 20 ते 25 पाने असतात. यानुसार प्रात्यक्षिक कार्यपुस्तिकेसाठी एका प्रात्यक्षिकासाठी साधारण 10 ते 15 पाने असतात. यानुसार प्रात्यक्षिक कार्यपुस्तिकेसाठी पुढीलप्रमाणे लेखन आणि संपादनासाठीचे मानधन दर प्रस्तावित करण्यात आले आहे.

कृषी विज्ञान विद्याशाखेंतर्गत पदविका आणि प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसन कार्यासाठी प्रात्यक्षिक कार्य पुस्तिकेच्या लेखन आणि संपादनासाठी पुढीलप्रमाणे मानधन दर असावेत.

| अ.क्र | पदविका आणि प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी सध्या अस्तित्वात असलेले पाठपुस्तकाचे मानधन दर | प्रात्यक्षिक पुस्तिकेसाठी प्रस्तावित मानधन दर |
|---|---|---|
| 01 | लेखन कार्यासाठी – रु. 8000/- प्रती घटक (साधारण 25 पाने) | रु. 5000/- प्रती घटक (साधारणपणे 10 ते 15 पाने) |
| 02 | संपादन कार्यासाठी – 6000/- प्रती श्रेयांक (10 ते 12 प्रात्यक्षिके – साधारणपणे 200 पाने) | रु. 5000/- प्रती श्रेयांक (10 ते 12 प्रात्यक्षिके – साधारणपणे 150 पाने) |

**व्यवस्थापन मंडळ ठराव :** उपरोक्त विषयाबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येऊन प्रात्यक्षिक पुस्तिकेसाठी वरील अ.क्र. 01 व 02 करिता रु. 4,000/- मानधन देण्याबाबत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

**कुलगुरू तथा अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**

**कुलसचिव तथा सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**